| | |
|---|---|
| दाखल तारीख | २८/१२/२०२० |
| नोंदणी तारीख | २८/१२/२०२० |
| निर्णय तारीख | २४/०३/२०२६ |
| कालावधी | ०५ व.,०२ म., दि.२७. |
| CNR No.MHGA050008342020 | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.०८ खाली.** |
| **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.**<br>(पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे) | |
| **अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील** | **अपराध क्र. ४९०/२०२०,**<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | २४/०३/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४९९/२०२०** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस स्टेशन अधिकारी, देसाईगंज,<br>ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.<br>(सचिन रूपलाल माटे) |
| **अभियोग पक्षातर्फे** | **श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,**<br>विशेष सहायक सरकारी अधिवक्ता |
| **आरोपी :** | **गजानन धोंडबा कैकाडे,**<br>वय – ४० वर्ष, धंदा – वाहन चालक,<br>रा. विठ्ठल मंदीरजवळ, तास,<br>ता. भिवापुर, जि. नागपुर. |
| **आरोपीतर्फे अधिवक्ता :** | **श्री. एम.आर.शेंडे.** |

भाग – ब

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | २४/११/२०२० |
| एफ.आय.आर. दिनांक : | २४/११/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | २८/१२/२०२० |
| गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक : | ३०/०९/२०२१ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | २९/११/२०२१ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | २२/०१/२०२६ |
| निकाल दिनांक : | २४/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक | ---- |

आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गजानन धोंडबा कैकाडे | --- | २८/१२/२०२० | भा.दं.सं.चे कलम २७९, ३३७, ३३८ व १८४, १३४/१७७ मो.वा.का. | निर्दोष | नाही | नाही |

भाग – क
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]
अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सचिन रूपलाल माटे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | ओमराज ज्ञानबा हारदुरे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.३ | प्रदिप वामन माटे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | साक्षदार |
| अ.सा.क्र.४ | सचिन हरीदास चव्हारे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | साक्षदार |
| अ.सा.क्र.५ | आशुतोष गजानन माटे (**नि.क्र.०८ च्या पुढे**) | साक्षदार |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.६ | वासुदेव भगवान अलोणे **(नि.क्र.०८ च्या पुढे)** | तपासी अधिकारी |

बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | **नि.क्र.१२** | फिर्याद |
| २ | **नि.क्र.१३** | छापील प्रथम खबर अहवाल |
| ३ | **नि.क्र.पी.१४/पी.डब्ल्यु.२** | घटनास्थळ पंचनामा |

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

| अ. क्र. | मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक २४/०३/२०२६)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८४, १३४/१७७ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाकरिता खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचे कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि.२४/११/२०२० ला अंदाजे १६.०० ते १६.३० वाजताच्या दरम्यान मौजा किन्हाळा मोहटोला फाटयावर, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील टिप्पर क्र. एम.एच.४०–बी.जी.–४६४० मानवी जीवन धोक्यात येईल अगर क्षती पोहोचण्याचा संभव होईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले ? | ...**नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त उल्लेखीत वाहन मानवी जीवन किंवा इतरांची व्यकतीगत सुरक्षीतता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालविले व मोटरसायकल क्र.एम.एच.४०–ए.बी. ६२१८ ला धडक दिली व तिचा चालक प्रदिप वामन माटे व मागे बसलेला सचिन हरीदास चव्हारे यांना साधी दुखापत पोहचविली ? | ...**नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त उल्लेखीत वाहन मानवी जीवन किंवा इतरांची व्यकतीगत सुरक्षीतता धोक्यात | |

येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालविले व मोटरसायकल क्र.एम.एच.४०–ए.बी. ६२१८ ला धडक दिली व त्यावर बसलेला आशितोष गजानन माटे यांना जबर दुखापत पोहचविली ? **...नकारार्थी**

४. अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी त्याच्या ताब्यातील उपरोक्त उल्लेखीत वाहन रस्त्याची परिस्थिती लक्षात न घेता सार्वजनिक ठिकाणी मानवी जीवीतास धोका निर्माण होईल इतक्या वेगाने चालविताना आढळून आला ? **...नकारार्थी**

५. अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने उपरोक्त उल्लेखीत वाहनाने घडलेल्या अपघाताची खबर जवळपासच्या पोलीस ठाण्यात न देता घटनास्थळावरून पलायन केले ? **...नकारार्थी**

६. आदेश काय ? **...अंतिम आदेशाप्रमाणे**

## कारणमिमांसा

२. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने सचिन रूपलाल माटे **(अ.सा.क्र.१),** ओमराज ज्ञानबा हारदुरे **(अ.सा.क्र.२),** प्रदिप वामन माटे **(अ.सा.क्र.३),** सचिन हरीदास चव्हारे **(अ.सा.क्र.४),** आशुतोष गजानन माटे **(अ.सा.क्र.५)** व वासुदेव भगवान अलोणे **(अ.सा.क्र.६)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.१९)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीचा भारतीय नागरीक

सुरक्षा संहितेचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जवाब नोंदविण्यात आला. त्याचा बचाव त्याला खोटया प्रकरणात गुंतविल्याचा आहे.

<u>**मुद्दा क्र. १ ते ५ करीता**</u> :–

**३.** मुद्दा क्र. १ ते ५ हे एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता त्यांचे विवेचन एकत्रितरित्या चर्चीले जात आहे.

४. सचिन **(अ.सा.क्र.१)** फिर्यादी याच्या साक्षेत असे आले की, त्याला अपघाताच्या घटनेबाबत तो घरी असतांना फोनव्दारे माहिती पडले होते. त्यानंतर त्याने पोलीस स्टेशन, देसाईगंज येथे फिर्याद **(नि.क्र.पी.१२)** दाखल केली व त्यानुसार छापील प्रथम खबर अहवाल **(नि.क्र.पी.१३)** नोंद करण्यात आली होती. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटनेच्या दिवशी त्याचे चुलत भाऊ दारू पिवुन होते व त्यांना मोटरसायकलवर बरोबर बसता येत नव्हते.

५. ओमराज **(अ.सा.क्र.२)** पंच साक्षदार यांच्या साक्षेत असे आले की, दि. २४.११.२०२० ला त्यांना शिरपुर मोहटोला फाटयाजवळ पोलीसांनी पंच म्हणुन बोलाविले होते. तिथे तीन जखमी इसम हजर होते. त्यांना गडचिरोली रूग्णालयात दाखल केले होते. त्याठिकाणी दुचाकी वाहन खाली पडले होते व एक टिप्पर उजव्या दिशेला उभा होता. पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा **(नि.क्र.पी.डब्ल्यु.२–१४)** तयार केला होता व त्यांची सही घेतली होती.

६. प्रदिप **(अ.सा.क्र.३)** प्रकरणातील जखमी असुन त्यांच्या साक्षेत असे आले की, फिर्यादी सचिन हा त्यांचा भाऊ आहे. पोटगाववरून ते, आशितोष व सचिन सोबत दुचाकीने ट्रिपल सिट गावाकडे दुपारी २.०० ते ३.०० वाजता येत होते. पोटगावच्या रस्त्यावर मोहटोला डोंगरगाव जाण्याकरीता एक चौक आहे त्या ठिकाणाहुन ते जात असतांना मोहटोला या गावाकडुन एक टिप्पर येत होता. तेथे जंगल आहे. तिथे अपघात झाला होता. तो बेहोश झाला होता. त्याच्या हाताल व डोक्याला लागले होते. आशुतोषचा पाय तुटला होता. सदर साक्षदाराने उलटतपासात मान्य केले की, घटनास्थळी झुडुपी जंगल आहे व त्यामुळे त्याठिकाणी जेव्हापर्यंत एखादे वाहन एकदम समोरासमोर येत नाही तेव्हापर्यंत ते वाहन एकमेकाला दिसत नाही.

७. सचिन **(अ.सा.क्र.४)** हा प्रकरणातील दुसरा जखमी असुन त्यांच्या साक्षेत असे आले की, त्याने आरोपीला पहिल्यांदा न्यायालयात बघितले आहे. अपघात मोहटोला, पोटगांव, शिरपुर व डोंगरगाव या गावांना जाणा–या चौकामध्ये झाला होता. त्यावेळेस प्रदिप (अ.सा.क्र.३) गाडी चालवित होता. मधामध्ये आशितोष माटे व मागे तो बसला होता. टिप्परने त्यांच्या दुचाकीला धडक दिली होती. त्यानंतर काय झाले त्यांना माहित नाही. त्यांना ब्रम्हपुरी येथील दवाखाण्यात होश आला होता. त्या अपघातामध्ये त्याच्या डोक्याला व हाताला लागले होते. सदर साक्षदाराने उलटतपासात मान्य केले की, ज्या टिप्परने त्यांच्या वाहनाला धडक दिली होती त्या टिप्परचा नंबर त्यांना माहिती नाही.

८. आशुतोष **(अ.सा.क्र.५)** प्रकरणातील तिसरा जखमी असुन त्याच्या साक्षेत असे आले की, तो आरोपीला ओळखतो. घटना दि. २४.११.२०२० ची आहे. तो पोटगांव वरून डोंगरगांवकडे येत होता. त्या रस्त्यावरील चारफाटयाजवळ अपघात झाला होता. एक ट्क मोहटोला गावाकडुन शिरपुर गावाकडे येत होता. त्यावेळेस ते तिथे थांबुन होते. तेव्हा त्या ट्कने त्यांना धडक दिली. तेव्हा ते गाडीसह अंदाजे १० ते १५ फुट लांब घसाटत गेले होते. त्यांची गाडी पुलावर नव्हती. घसाटत नेल्यामुळे त्यांची गाडी पुलावर असलेल्या मुंडा/पिल्लरला धडकली. ते तिघेही अंदाजे ६ ते ७ फुट वर हवेमध्ये गेले होते. तेव्हा ते कसईच्या झुडुपामध्ये पडले. सचिन चव्हारे ट्कच्या समोर पडला. प्रदिप माटे त्याच्या डाव्या बाजुला पडला. तेव्हा त्या ट्कचा चालक त्याच्या जवळ कुदला व जंगलामध्ये पळाला. तो पडल्यामुळे त्याच्या डोक्याला व खांदयाला पुलाच्या बट्टीचा भाग लागला होता. त्यानंतर तेथे लोक धावले. त्यांनी त्यांच्या भावाचा फोन नंबर त्यांना सांगीतला. त्यांना दवाखाण्यात नेण्यात आले, त्या अपघातामध्ये त्याचा पाय मोडला होता तसेच डोक्याला व खांदयाला मार लागला होता. त्या ट्कचा नंबर त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगीतले.

९. सदर साक्षदाराने उलटतपासात मान्य केले की, पोलीसांना बयान देतेवेळेस ''त्यावेळेस ते तिथे थांबुन होते, तेव्हा त्या ट्कने त्यांना धडक दिली, तेव्हा ते गाडीसह अंदाजे १० ते १५ फुट लांब घसाटत गेले होते, त्यांची गाडी पुलावर नव्हती, घसाटत नेल्यामुळे त्यांची गाडी पुलावर असलेल्या मुंडा/पिल्लरला धडकली, ते तिघेही अंदाजे ६

ते ७ फुट वर हवेमध्ये गेले होते, तेव्हा ते कसईच्या झुडुपामध्ये पडले, सचिन चव्हारे ट्रकच्या समोर पडला, प्रदिप माटे त्याच्या डाव्या बाजुला पडला, तेव्हा त्या ट्रकचा चालक त्याच्या जवळ कुदला व जंगलामध्ये पळाला, तो पडल्यामुळे त्याच्या डोक्याला व खांदयाला पुलाच्या बट्टीचा भाग लागला होता, त्यानंतर तेथे लोक धावले, त्यांनी त्यांच्या भावाचा फोन नंबर त्यांना सांगीतला'', असे सांगीतले नव्हते. त्याला मार लागला असल्यामुळे तो सदर बाबी पोलीसांना सांगु शकला नव्हता. पोलीसांनी त्याचे बयान त्याच दिवशी नोंदविले होते. त्याने आरोपीला प्रथमत: न्यायालयात बघितले आहे. सदर ट्रक कोण चालवित होता हे त्याने पाहिले नव्हते. घटनेच्या पुर्वी घटनास्थळी दोन तीन अपघात झालेले होते.

**१०.** अलोणे **(अ.सा.क्र.६)** तपासी अधिकारी यांच्या पुराव्यात असे आले की, त्यांना केस डायरी प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा **(नि.क्र.पी.डब्ल्यु.२/पी.१४)** तयार केला होता. दि. २५.११.२०२० ला मोटर सायकल व टिप्पर पोलीस स्टेशन येथे आणले होते. वाहन चालक घटनास्थळावरून पळुन गेल्यामुळे मो.वा.का.कलम १३४ सह कलम १७७ ची गुन्हयामध्ये वाढ केली होती. साक्षदारांचे बयान नोंदविले होते व दोषारोपपत्र दाखल केले होते.

**११.** अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी/सचिन (अ.सा.क्र.१) हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षदार नाही. त्यामुळे त्याची साक्ष फक्त फिर्याद **(नि.क्र.१२)** व एफ.आय.आर. **(नि.क्र.१३)** दाखल करण्यापुरती मर्यादीत

स्वरूपाची आहे. ओमराज (अ.सा.क्र.२) व अलोणे (अ.सा.क्र.६) यांची साक्ष घटनास्थळ पंचनामा **(नि.क्र.पी.डब्ल्यु.२/पी.१४)** तयार करण्यापुरती मर्यादीत स्वरूपाची आहे. त्यांच्या साक्षेव्दारे घटना कशी घडली होती, ही बाब सिध्द होत नाही.

**१२.** अ.सा.क्र.३, ४ व ५ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षदार तसेच जखमी असुन त्यांच्या साक्षेनुसार अपघातातील ट्कचा चालक कोण होता हे त्यांना माहित नाही व त्यांनी पाहिले सुध्दा नाही. आशुतोष (अ.सा.क्र.५) याने जरी त्याच्या साक्षेत ट्कचा चालक त्याच्या जवळ कुदला व तेथुन पळुन गेला असे सांगीतले असले तरी त्याने उलटतपासात सदर ट्क कोण चालवित होता, हे त्याने बघितले नव्हते, असे सांगीतले असल्यामुळे आरोपीचा त्या अपघाताशी संबंध होता किंवा कसे, हे सिध्द होत नाही. तिन्ही साक्षदारांनी घटनेच्या ठिकाणी झुडुपी जंगल असल्यामुळे समोरील वाहन दिसत नव्हते, ही बाब मान्य केलेली आहे. अशापरिस्थीतीत समोरचे वाहन किती वेगाने येत होते व अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे सुध्दा स्पष्ट होत नाही. तसेच तिन्ही जखमींच्या साक्षेमध्ये ट्क चालकाची कोणती चुकी होती, ट्क चालकाने कोणती काळजी घेवुन ट्क चालवायला पाहिजे होता जेणेकरून सदर अपघात झाला नसता याबाबत काहीही सांगीतलेले नाही. ट्कचा नोंदणी क्रमांक काय होता, सदर ट्क कोणत्या कंपनीचा होता, याबाबत कोणत्याही साक्षदाराने सांगीतलेले नाही. या कारणावरून सुध्दा सदर ट्क चालकाच्या चुकीमुळे अपघात झाला होता, ही बाब सिध्द होत नाही.

**१३.** एकंदरीत अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षदाराच्या साक्षेव्दारे अपघात पोटगांव ते डोंगरगाव दरम्यान असलेल्या रोडवरील चौकामध्ये ट्क व दुचाकी यांची टक्कर झाल्याने घडला होता व त्या अपघातामध्ये अ.सा.क्र.३ व ४ ला साधी दुखापत तसेच अ.सा.क्र.५ ला जबर दुखापत झाली होती, ही बाब सिध्द झालेली आहे. परंतु सदर अपघाताकरीता ट्कचा चालकच दोषी होता, सदर ट्क कोणत्या कंपनीचा होता, त्याचा वाहन क्रमांक काय होता, तसेच सदर ट्क प्रकरणातील आरोपीच चालवित होता, या बाबी सबळ पुराव्याच्या आधारे अभियोग पक्षाने सिध्द केलेल्या नाही किंवा तसा कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. सबब, आरोपी विरुद्ध भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७ व ३३८ तसेच मो.वा.का.चे कलम १८४, १३४/१७७ नुसार अपराध सिद्ध करणारा कोणताही पुरावा अभियोग पक्ष अभिलेखावर आणू शकला नाही, असे मत नोंदवून मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करीताः–</u>**

**१४.** मुद्दा क्र. १ ते ५ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१(१) ची पुर्तता आधीच केलेली आहे. म्हणून मुद्दा क्र. ६ च्या उत्तरार्थ मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

1. आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८ (१) प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३३७ व ३३८ तसेच मोटर वाहन कायद्याचे

कलम १८४, १३४/१७७ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचा जामीनबंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** सदर न्यायनिर्णयाची प्रत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४०६ च्या पूर्ततेकरिता जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी. **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.24 17:41:22 +0530

दिनांक :२४/०३/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902